Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

# जालना जिल्ह्यातील तूर पिकाचा भौगोलीक अभ्यास

**नारायण जयवंतराव पाझाडे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद

**डॉ. विजय बैसाने**
संशोधक मार्गदर्शक
दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज,
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

जगाची लोकसंख्या वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज देखिल वाढत आहे. लोकसंखेच्या बाबतीत भारताचा जगामध्ये द्वितीय क्रमांक लागतो. भारतात लोकसंख्या वाढीमुळे देखिल अन्नधान्याची मागणी अधिक आहे. अन्नधान्याची मागणी पुर्ण करण्यासाठी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध अन्नधान्य पिकांचे उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय आहारात गहू, ज्वारी, बाजरी, डाळी, तांदुळ, पालेभाज्या इत्यादीचा समावेश असतो. डाळींचा समावेश दररोजच्या आहरामध्ये असतो. यामुळे डाळींची मागणी देखिल अधिक असते. उदा. मुग, उडीद, हरभरा, तूर, चवळी, मटकी, मसूर इत्यादी. कडधान्यापासून प्रक्रिया करून डाळ तयार केली जाते. म्हणून भारतीय शेतीमध्ये कडधान्याचे लागवड करून उत्पादन घेतले जाते.

वरील कडधान्यापैकी भारतात तूर डाळीस जास्त मागणी दिसून येते. त्यामुळे तूर यां कडधान्याचे लागवड क्षेत्र व उत्पादन क्षेत्रात वाढ होताना दिसून येते. महाराष्ट्रामध्ये १० लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर तूर हे पिक घेतले जाते. जालना जिल्ह्यामध्ये देखिल तूर डाळीची मागणी वाढत असल्यामुळे तूर पिकाचे क्षेत्र वाढत आहे. म्हणून 'जालना जिल्ह्यातील तुर पिकांचा भौगोलीक अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**बीज संज्ञा :** कडधान्य, तुर पिक लागवड क्षेत्र, तुर पिक उत्पादन

**प्रस्तावना :**

युनायटेड नेशन्स (UNO) ने वर्ष २०१६ हे ''आंतरराष्ट्रीय कडधान्य वर्ष'' म्हणून साजरे केले. कडधान्याचे आपल्या आहारातील महत्व यासाठी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे तसेच अन्न सुरक्षितता व पोषणाच्या दृष्टीने कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढ होणे अत्यावश्यक आहे. आपण सुद्धा जालना जिल्ह्यामध्ये विविध डाळवर्गीय पिकांखालील क्षेत्र व उत्पादकता वाढ याचा अभ्यास करणार आहोत. तुर, मुग, उडीद, मटकी, हरभरा ही महाराष्ट्रातील प्रमुख कडधान्य पिके आहे. या पिकांचे उत्पादन महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये घेतले जाते. तसेच जालना जिल्ह्यातही मागणीनुसार कडधान्य पिकांचे उत्पादन घेतले जाते. वरील कडधान्यापैकी तुर डाळीची मागणी जालना जिल्ह्यात वाढत आहे. म्हणून पिक क्षेत्रही वाढत असल्याचे दिसून येते.

**अभ्यास क्षेत्र :**

जालना जिल्ह्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. मराठवाड्यातील जालना हा महत्त्वपूर्ण शेती उत्पादक जिल्हा असून येथे मराठवाड्यातील सर्वात मोठी बाजर समिती आहे. तरी हा जिल्हा विकासाच्या दृष्टीने मागासलेला दिसून येतो. जिल्ह्यात पर्जन्याचे प्रमाणे ६५० ते ७०० मीमी एवढे आढळते. जिल्ह्याचे तापमाण किमान १० ते १२$^\circ$ से. व कमाल तापमाण ४० ते ४२$^\circ$ से. इतके आहे. जिल्ह्यात गोदावरी, दुधना, पुर्णा, कुंडलीका, गलाटी, खेळणा, धामणा, गिरजा, जीवरेखा या नद्या आहेत.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

जालना जिल्ह्यातील कडधान्य पिकांचा अभ्यास करणे.
जालना जिल्ह्यातील लागवड क्षेत्र व तूर पिकाचा अभ्यास.
जालना जिल्ह्यातील तूर पिक उत्पादनाचा अभ्यास.

**गृहितके :**

१) तुर पिक लागवड क्षेत्र वाढल्यास उत्पादन वाढते.
२) तुर पिक उत्पादन वाढीमुळे शेतकऱ्यास आर्थिक नफा वाढतो.

**संशोधन पद्धती व आधार सामुग्री संकलन :**

जालना जिल्ह्यातील तूर पीकाचा भौगोलीक अभ्यास करण्यासाठी दुय्यम स्वरूपाच्या आधार सामुग्रीचा वापर केला आहे. दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीसाठी जालना जिल्ह्यातील सामाजिक आर्थिक समालोचन अहवाल २०१६-१७, कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांची वेबसाईटवरील माहिती संकलीत केली आहे. संकलित तक्त्यातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी विविध तंत्राचा वापर करण्यात आला. माहितीचे विश्लेषणासाठी तक्ते, आलेख यांचा उपयोग केला.

**विषय विवेचन :**

**तुर पिकासाठी आवश्यक बाबी**

- हवामान : तापमान २१ ते २५ अंश सें. तापमान लागते.
- जमिन : मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमिन तुरीसाठी चांगली आहे.
- पेरणीची वेळ : जुनच्या दुसऱ्या पंधरवाढ्यात पेरणी करावी.
- पीक पद्धती व विशेष माहिती : ज्वार + तूर (३.३) बाजरी + तूर, तूर + मूग, सोयाबीन+ तूर (४:२) किंवा उडीद या आंतरपीक पध्दतीचा अवलंब करावा. तसेच सलग पिक पद्धतीद्वारे देखिल तूर पिक उत्पादन घेता येते.
- अंतर मशागत : सोयाबीन+तूर (४:२) साठी ३०.६०.३०.कि./हे नत्र स्फुरद व पालाश देवून प्रत्येक ४ ओळीनंतर सऱ्या काढाव्या ६०-७५ दिवसांपर्यंत तणाच्या बंदोबस्तासाठी व जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी २ कोळपण्या व २ खुरपण्या आवश्यक
- पिकातील अंतर : ६० द २० परंतू आय.सी. ८७. या जातीसाठी ४५ द १५ मध्यम
- कालावधीच्या कोरडवाहू वाणासाठी ९० द २०
- रासायनिक खते कि.हे. (नत्र:स्फुरद:पालाश) : २५.५०.० किलो नत्र स्फूरद, पालाश, संपुर्ण
- मात्रा पेरणीच्या वेळी जमिनीत पेरुन द्यावीत.
- पाणी व्यवस्थापन : तूर हे प्रामुख्याने खरीप हंगामामधील पीक असल्यामुळे ते पावसावर वाढते. तथापि पावसामध्ये खंड पडल्यास किंवा पाण्याचा ताण पडल्यास आरि सिंचनाची सुविधा असल्यास पीकास वाढीच्या अवस्थेमध्ये (३० ते ३५ दिवस), फुलोऱ्याच्या अवस्थेमध्ये (६० ते ७० दिवस) आणि शेंगा भरावयाच्या अवस्थेमध्ये पाणी द्यावे. त्यामुळे पीक उत्पादनात वाढ होते.
- पीक संरक्षण : तुरीमध्ये फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटेअळी, पिसारी पतंग, काळी माशी, या किडीमुळे ३० ते ४० टक्के नुकसान होते. ट्रायकोडर्मा, क्रायसोपा, एच.एन.पी.व्ही. अशा जैविक किड नियंत्रणाचा वापर करावा.
- पिक काढणी : तूरीच्या शेंगा वाळल्यावर पीक कापून घ्यावे व खळ्यावर काठीच्या सहाय्याने किंवा पेंढ्या झोडपून शेंगा आणि दाणे अलग करावे.
- साठवण : साठवणीपूर्वी तूर धान्य ४ - ५ दिवस चांगले उन्हात वाळवून पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. शक्य असल्यास कडूलिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणीतील कीडीपासून सुरक्षित राहते.
- उत्पादन : अशाप्रकारे तुरीची लागवड केल्यास सरासरी १५ ते १६ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळू शकते.

**जालना जिल्ह्यातील तूर उत्पादन :**

जालना जिल्ह्यातील खरीप हंगामध्ये तूर हे प्रमुख कडधान्यपिक मोठ्या प्रमाणात घेतल्या जाते. जालना जिल्ह्यात तूरीसाठी मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे उत्पादित तूर कमी वाहतुक खर्चात बाजारात विकण्यासाठी आणली जाते. व शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. जालना जिल्ह्यातील जमिन तूर पिकासाठी उपयुक्त असल्यामुळे तूर पिकाचे क्षेत्र वाढलेले दिसून येते.

तक्ता क्र. १

जालना जिल्ह्यातील तूर पिक लागवडीखालील एकूण क्षेत्र

लागवड क्षेत्र हे. मध्ये संदर्भ वर्ष २०१६-१७

| अ.क्र. | तालुका | तूर पिकाखालील क्षेत्र |
|---|---|---|
| १ | भोकरदन | ६१८१ |
| २ | जाफ्राबाद | ६४२८ |
| ३ | जालना | १०९९७ |
| ४ | बदनापूर | ८६१५ |
| ५ | घनसावंगी | १२०८१ |
| ६ | परतूर | ११७८२ |
| ७ | मंठा | ८६६१ |
| ८ | अंबड | ११४२१ |
| | **एकूण** | **७६१६६** |

**स्त्रोत :** जालना जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन-२०१६-१७

वरील आकडेवारी नुसार २०१६-१७ या वर्षामध्ये जालना जिल्ह्यातील तूर लागवडीचे एकूण क्षेत्र ७६१६६ हे. एवढे आहे. जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात सर्वाधिक लागवड क्षेत्र १२०८१ हे. तसेच भोकरदन तालुक्यचीं सर्वात कमी लागवड क्षेत्र ६१८१ हेक्टर एवढे आहे.

**जालना जिल्ह्यातील तूर पिकाचे तालुकानिहाय उत्पादन**

तक्ता क्र. २

**तूर पिकाचे तालुकानिहाय उत्पादन**

संदर्भ वर्ष २०१६-१७

| अ.क्र. | तालुका | तूर पिकाचे उत्पादन |
|---|---|---|
| १ | भोकरदन | ८९६८.६३ |
| २ | जाफ्राबाद | ९८८६.२६ |
| ३ | जालना | ११८२१.७८ |
| ४ | बदनापूर | ८९५९.६० |
| ५ | घनसावंगी | २००१८.२२ |
| ६ | परतूर | १९१२२.१९ |
| ७ | मंठा | १२९६५.५२ |
| ८ | अंबड | ११४२१.०० |
| | एकूण | १०३१६३.२० |

**स्त्रोत :** सामाजिक आर्थिक समालोचन जालना जिल्हा - २०१६-१७

जालना जिल्ह्यात वर्ष २०१६-१७ मध्ये तुर पिकाचे एकूण उत्पादन १०३१६३.२० मे. टन एवढे झाले. सर्वाधिक उत्पादन हे घनसावंगी तालुकात २००१८.२२ मे.टन एवढे झाले असून सर्वात कमी तुर पिकाचे उत्पादन ८९५९.६० एवढे झाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

साधारणत: जालना जिल्ह्याचे तुर लागवड क्षेत्र हे ७६१६६ हे. एवढे असून तुरीचे एकूण उत्पादन १०३१६३.२० मे. ट. ऐवढे झालेले दिसून येते. तुर लागवडीसाठी जालना जिल्ह्यात योग्य हवामान व पोषक जमिन असल्यामुळे उत्पादन वरील प्रमाणे झालेले दिसून येते.

**संदर्भ :**

१) जालना जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन-२०१७-१८
२) कृषी भूगोल-डॉ. सूर्यवंशी डी.एस. / निराली प्रकाशन -
३) भूगोल व कृषी - डॉ. सवदी
४) कृषि विभाग महाराष्ट्र शासन वेबसाईड